सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**पोलीस विभाग**




थेट दूरध्वनी क्र. :- +९१-२२-२२६२ १२२०
दूरध्वनी केंद्र क्र.:- +९१-२२-२२६२ ०११४
विस्तारित क्र. :- १३८ (पोलीस उप आयुक्त (प्रकटी.)
६२९ (वाचक अधिकारी),
१२१ (स्टेनो), ६२८ (लेखनिक)
ई.मेल :- cp.mum.dcp.det@mahapolice.gov.in

पोलीस उप-आयुक्त(प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय
पोलीस आयुक्त कार्यालयीन आवार
( नवीन इमारत), चौथा मजला,
महात्मा फुले मंडई समोर
डॉ. दा.नौ. मार्ग, मुंबई - ४०० ००१

**क्रमांक पोउआ (प्रकटी)/जा.क्र. १०३५/२०२६** **दिनांक १३/०७/२०२६**

प्रति,

प्रभारी पोलीस निरीक्षक,
पोलीस परिपत्रक कार्यालय,
मुंबई.

विषय :- Best Detection (उत्कृष्ट गुन्हे शोध) व Best Conviction (उत्कृष्ट अपराधसिध्दी) of the Month **June 2026** पोलीस नोटीस व वेबसेल मध्ये प्रसिध्द करणेबाबत.

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदारांना बेस्ट डिटेक्शन/बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध, उत्कृष्ट अपराधसिध्दी याकरीता प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते.

**माहे जून -२०२६** करीता **'' बेस्ट डिटेक्शन अर्थात (उत्कृष्ट गुन्हे शोध) तसेच बेस्ट कनव्हिक्शन अर्थात (उत्कृष्ट अपराधसिध्दी)''** याकरीता खालील नमुद पोलीस ठाणे यांची निवड करण्यात आलेली आहे. प्रत्येक महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद **प्रपत्र 'क'** प्रमाणे माहिती भरुन सोबत तपासी पथकातील फक्त ०४ नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व अंमलदार यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटक प्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे. तरी सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

**अ) माहे जून - २०२६ गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न**

१. **एम.आय.डी.सी पोलीस ठाणे**, पश्चिम परिमंडळ ०३, मुंबई गु.र.क्र. ६३५/२०२६ कलम ३१६(४), ३(५) भा.न्या.स.

२. **युनिट ०१, गुप्रशा., गुअवि.,** प्रकटीकरण, मुंबई. पवई पोलीस ठाणे गु.र.क्र. ७२/२०२६ कलम २०४, २०५, ३१८(४), ३१९, ३३६(३), ३३७, ३४०, ३(५) भा.न्या.सं. **(सहार पो ठाणे गु.र.क्र. ५७८/२०२६)**

**ब) माहे जून - २०२६ सर्वोत्कृष्ट अपराध सिध्दी**

१. **मानखुर्द पोलीस ठाणे**, पूर्व परिमंडळ ०१, मुंबई गु.र.क्र. ५३५/२०२१ कलम ३७६ (२)(एन) ५०६ भादवि सह कलम ४, ६, ८, १२ पोक्सो.

२. **मेघवाडी पोलीस ठाणे**, पश्चिम परिमंडळ ०३, मुंबई गु.र.क्र. १९०/२०२०, कलम ३०२, ३०७ भादंवि.

**कृ.मा.पहा.......**

सदर उत्कृष्ट गुन्हे शोध (बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ) व उत्कृष्ट अपराधसिध्दी (बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ) **माहे जून २०२६** बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती पोलीस नोटीस व मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

**सही/-**
पोलीस उप-आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.

**प्रत**:-

वरिष्ठ पोलीस निरीक्षक- वेबसेल, पोलीस आयुक्त कार्यालयाचे आवार, मुंबई.

**मजकुर :-**

दिनांक १०/०७/२०२६ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **"Best Detection of the Month"** माहे **जून २०२६** या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ जून २०२६ - ०२ गुन्हे

| | | |
|---|---|---|
| ०१ | एम.आय.डी.सी पोलीस ठाणे<br>**पश्चिम परिमंडळ ०३, मुंबई.** | **गु.र.क्र.** ६३५/ २०२६ कलम ३१६(४), ३(५) भा.न्या.सं. |

**-: '' दागीने चोरी झाल्याचा बनाव करुन मालमत्तेचा अपहार करणे '' :-**

नमुद गुन्हयात फि'च्या कंपनीमध्ये काम करणारे संजय मांडवकर यांनी फोन करुन कळविले की सायं. ०६.०० वा. गेलेला जोखमवाला हा दागिने पोहोच करुन अद्यापपर्यंत परत आलेला नाही. तसेच तो त्याचा फोन देखील उचलत नाही आहे. म्हणुन फि'नी मांडवकर यांनी कॅरटलेनमध्ये फोन केला असता जोखमवाला हा दागिने घेवून पोहचलाच नाही असे समजले. त्यानंतर जोखमवाल्याचा ॲक्सीडेंट झाल्याने तो उपचाराकरिता हॉस्पीटल असल्याचे समजताच कंपनीच्या डिरेक्टर श्रीमती. युरिको मेनन, व जनरल मॅनेजर गणेश आचार्य व एच.आर. अजित कळमटे हे अविनाश कदम याला भेटण्याकरिता रुग्णालय येथे गेले असता त्याच्या प्रकृतीची चौकशी करुन त्याची प्रकृती स्थिर असून त्याला कोणतीही बाहय दुखापत झाली नसल्याचे डॉक्टरांनी सांगितले. जोखमवाला याचेकडे दागिन्याची चौकशी केली असता त्याला माहिती नसल्याचे त्याने सांगितले. एमएलसीमध्ये त्याला अपघास्थळी एका पिकअपने धडक दिली असल्याचे समजले. अविनाश याच्या एकंदरीत वर्तनावरुन, त्याने अपघाताविषयी दिलेल्या अस्पष्ट जबाबावरुन तसेच सदर अपघातामध्ये त्याला कोणतीही दुखापत झालेली नसताना तो रुग्णालयातच ॲडमिट राहण्याच्या करीत असलेल्या हट्टावरुन सदर अपघाताचा बनाव करुन त्याच्या अज्ञात साथिदारांसह मिळून त्यानेच त्याच्या ताब्यात विश्वासाने डिलीव्हरी करण्याकरिता दिलेल्या मालमत्तेचा अपहार केल्याने गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :- | श्री. कांचन पांडूरंग पवार, वय ४६ |
| चोरीस गेलेली मालमत्ता | :- | एकूण नग २१५ वजन ४२९.०५ ग्रॅम वजनाचे दागिने किंमत रु ६०,६५,६५६.६/- |
| हस्तगत मालमत्ता | :- | एकुण वजन ४२९ ग्रॅम वजनाचे दागीने एकुण किंमत रु. ६०,६५,६५४/- |
| आरोपी अटक व दिनांक | :- | १) अविनाश गंगाधर कदम वय २६<br>२) मनोज हणमंत जोगदंड, वय ४१<br>**अटक दिनांक :-**०९/०६/२०२६ |

**तपास-** नमुद गुन्हयाची माहीती मिळताच मा. वपोनि एमआयडीसी पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि पर्बत यांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या टिम तयार करण्यात आल्या व त्यांनी घटनास्थळाच्या सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करुन त्यामध्ये एक ॲक्सेस मोटारस्कुटर वरील इसम अपघात झालेल्या ठिकाणी संशयीत हालचाली करताना दिसुन येत होता त्याचा सुमारे ५० ते १०० लोकल सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करुन पाठलाग करुन त्यास ताब्यात घेवुन त्याचेकडे गुन्हयाच्या अनुषंगाने तपास करुन त्यास अटक करण्यात आलेली आहे अटक करुन त्याच्याकडुन गुन्हयातील चोरीस गेलेली रु. ६०,६५,६५४/- रुपयांची मालमत्ता हस्तगत करुन गुन्हा उघड करण्यात आला.

**एम.आय.डी.सी पोलीस ठाणे तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/अंमलदार नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस उप निरीक्षक | किरण दत्तात्रय पर्बत | प्रशस्तीपत्रक |
| २ | पो.ह.क्र. ०६१६४५ | गौतम गहिनाथ बडे | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पो.शि.क्र. ०९१५६२ | तुषार अरविंद जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पो.शि.क्र. ०९१७९७ | दिनेश दत्तु लोखंडे | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.शि.क्र. १३००६२ | प्रकाश दत्तात्रय शिंदे | प्रशस्तीपत्रक |

| | | |
|---|---|---|
| ०२ | **युनिट ०१, गुप्रशा., गुअवि**<br>प्रकटीकरण, मुंबई. | **गु.र.क्र.** ७२/२०२६ कलम २०४, २०५, ३१८(४), ३१९, ३३६(३), ३३७, ३४०, ३(५) भा. न्या.सं.<br>(सहार पोलीस ठाणे गु.र.क्र. ५७८/२०२६) |

**-: '' बनावट दस्तऐवज तयार करुन तोतयागिरी करुन फसवणुक '' :-**

नमूद गुन्यात अटक आरोपी महंमदगौस इब्राहिम खातीब व मसहब महमदगौस खातीब यानी ते मुंबई पोलीस दलात सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप आयुक्त/पोलीस उप निरीक्षक असल्याचा खोटा बहाणा करुन, अधिकारपद धारण न केल्याचे माहित असताना तसा समज व्हावा या उद्देशाने पोलीसाचा गणवेश परिधान करुन, सरकारने जारी केलेले ओळखपत्राचे बनावटीकरण करुन ते बनावट असल्याचे माहिती असताना तो बनावट दस्ताऐवज खरा म्हणून फिर्यादी यांना दाखवून त्यांचा मित्र नामे शाहीद रशीद कपाडीया यांचेसोबत संगनमत करुन त्यांना कर्ज मिळवून देण्याचा आमीष दाखवून फिर्यादीचा विश्वास संपादन करुन त्यांचेकडून अप्रामाणिकपणे, कपटीपणाने रुपये १० लाख इतकी रक्कम स्विकारली व त्या बदल्यात कर्ज मंजूर करुन न देता आणि स्विकारलेली रक्कम परत न करता त्यांची फसवणूक केलेली म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :- | श्री. यश ललीत मधुरा, वय २७ |
| फसवणुकीची मालमत्ता | :- | १०,००,०००/-रू. (दहा लक्ष रूपये फक्त) |
| हस्तगत मालमत्ता | :- | **आरोपी क्र. ०१ महंमदगौस इब्राहिम खातीब यांच्या जवळील ब्राउन रंगाचे पाकिटामध्ये मिळुन आलेल्या कागदपत्रे व इतर मुद्देमालचे वर्णन.**<br>१)MAHARASHTRA POLICE IDENTITY CARD त्यावर Dr. RAJ KHATIB Assistant commissioner of Police असे छापलेले.<br>२) MAHARASHTRA POLICE IDENTITY CARD त्यावर Dr. RAJ KHATIB Police Sub Inspector असे छापलेले.<br>३)MAHARASHTRA POLICE IDENTITY CARD त्यावर MAHMADGOUS IBRAHIM KHATIB Assistant commissioner of Police असे छापलेले.<br>४) आरोपीचे निवडणुक आयोगाचे ओळखपत्र नं. NBZ1841774<br>५) आरोपीचे नावाचे ड्रायव्हिंग लायसन्स नं. MH1020100007197<br>६) महंमदगौस इब्राहिम खातीब नावाचे महाराष्ट्र स्टेट मोटार ड्रायव्हिंग लायसन्स नं. MH1020100007197 ची छायाकिंत प्रत.<br>७) आरोपीचे नावाचे पॅनकार्ड नं. AZQPK6279E<br>८) आरोपीचे नावाचे आधार कार्ड नं. 967473014668.<br>९) आरोपीचे नावाचे एसबीआय ग्लोबल कार्ड नं. 6522940915146727<br>१०) भारतीय चलनातील एकुण ७४० रू.<br>११) आरोपी ए.सी.पी. खाकी युनिफॉर्म परिधान केलेला पासपोर्ट फोटो.<br>१३) मोबाईल फोनचे वर्णन.मोबाईलचे नाव - IPHONE 13 PRO MAX मॉडेल नं. MLLD3HN/A, SERIAL NO. TTJ3K997VF<br>१४) किं.अं.रू.३,५०,०००/- जुनी वापरती ग्रे रंगाची टाटा कंपनीची पंच मेक असलेले मोटार वाहन क्रमांक एम.एच. १२, एक्सएच ९४४७<br>नमुद वाहनात मिळून आलेले दिनांक २६/०९/२०२५ रोजीचे TAX INVOICE<br>**२) आरोपी मसहब महमंद गौस खातीब यांच्या जवळील काळया रंगाच्या पाकिटामध्ये मिळुन आलेल्या कागदपत्रे व इतर मुद्देमालचे वर्णन.**<br>१) MAHARASHTRA POLICE KICKBOXING UNIT IDENTITY CARD<br>२) आरोपीचे नावाचे भारत निवडणुक आयोगाचे ओळखपत्र नं. NBZ5709647<br>३) आरोपीचे नावाचे महाराष्ट्र स्टेट मोटार ड्रायव्हिंग लायसन्स नं. MH1020160019148<br>४) आरोपीचे नावाचे पॅनकार्ड नं. BZLPK0506C (minor)<br>५) आरोपीचे नावाचे पॅनकार्ड नं. BZLPK0506C (छायांकित प्रत)<br>६) मसहाब मोहमद गौस खातीब नावाचे आधार कार्ड नं. 202507131528<br>७) आरोपीचे नावाचे पुना डिस्ट्रीक्ट फुटबॉल असोशिएशनचे आय.डी. कार्ड<br>९) World Peace ambassador Dr. RAJ KHATIB (The World PeaceKeepers movement) असे छापील दोन व्हिजीटींग कार्ड दिसत आहे.<br>१०) MASHAB नावाचे एचडीएफसी बॅंकेचे व्हिसा डेबिट<br>११) 005200100180078 नंबरचे एचडीएफसी बॅंकेचे व्हिसा प्लॅटिनम |

| | | |
|---|---|---|
| | | डेबिट कार्ड<br>१३) YES BANK चे इंस्टंट अकाउण्ट डेबिट कार्ड नं. 2228551096717214.<br>१४) KHATIB NABISO IBRAHI या नावाचे येस बॅंकेचे प्लॅटिनम डेबिट कार्ड<br>१५) DELHI METRO ONE चे कार्ड नं. 43992074.<br>१६) CORDELIA CRUISES STANDARD चे महसाब मोहमद गौस खातीब नावाचे कार्ड.<br>१७) भारतीय चलनातील एकुण ६,३९० रू.<br>१८) मोबाईल फोनचे वर्णन मोबाईलचे नाव - IPHONE 13 PRO MAX<br>**शाहीद रशीद कपाडीया याचेकडुन हस्तगत करण्यात आलेला मुद्देमाल**<br>१) मोबाईलचे नाव - ॲप्पल कंपनीचा मोबाईल. IPHONE 15 PLUS<br>२) भारतीय चलनातील एकुण २७० रू. |
| आरोपी अटक व दिनांक | :- | १) महमंदगौस इब्राहिम खातीब, ५४ २) मसहब महमंद गौस खातीब, २६<br>३) शाहीद रशीद कपाडीया, वय ४२ **अटक दिनांक**:- २७/६/२०२६ |

**तपास-** नमुद गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक गणेश पिसाळ निवेदन करतात की, कक्ष-१, गु. प्र.शा., गु.अ.वि., मुंबई येथे प्राप्त तक्रारीवरुन शएक संशयित इसम वय अंदाजे ५० वर्षे हा वरिष्ठ पोलीस अधिकारी असल्याचा बनाव करुन बनावट शासकिय ओळखपत्रे व पोलीस लिहलेली पाटी असलेल्या मोटार कारचा वापर करुन त्याच्या इतर साथीदारांसह बॅंकेतून कर्ज मंजूर करुन देण्याच्या बहाण्याने नागरिकांकडून पैसे घेऊन त्यांच्या फसवणूक करीत असल्याच्या तक्रार प्राप्त होती.

सदर प्राप्त माहितीचे अनुषंगाने मानवी व तांत्रिक तपास कौशल्याचा वापर करुन सदर संशयीत इसम हे हॉटेल द लिला, अंधेरी, मुंबई येथे येणार असल्याची माहिती प्राप्त होताच कक्ष-१ चे पोलीस पथकासह सदर ठिकाणी सापळा रचून दिनांक २६/०६/२०२६ रोजी खालील नमूद एकूण तीन संशयीत इसमांना पोलीस पाटी असलेल्या राखाडी रंगाच्या MH12XH9447, TATA PUNCH मोटर कार सह ताब्यात घेण्यात आले आहे

१) महमंदगौस इब्राहिम खातीब, वय ५४ वर्षे, धंदा नोकरी, रा.ठी. राज मंजिल बसवेश्वर चौक, बुधवार पेठ, खातीब गल्ली, मिरज, सांगली, महाराष्ट्र, ४१६४१०, मोबा. ९८२२७९००८७, ९७६४००७७८६,

२) मसहब महमंद गौस खातीब, वय २६ वर्षे,धंदा शिक्षण, रा.ठी. राज मंजिल बसवेश्वर चौक, बुधवार पेठ, खातीब गल्ली, मिरज, सांगली, महाराष्ट्र, ४१६४१०, मोबा. ८२०८६०२४७७

३) शाहीद रशीद कपाडीया, वय ४२ वर्षे, रा.ठी. ७/५६, चौधरी मोहल्ला, बाबु वाहिद बिल्डींग, बंदर रोड, दुधनाका, कल्याण वेस्ट, जि. ठाणे, राज्य महाराष्ट्र, ४२१३०१, मोबा. ८०९७४६९१३१, ९७३०२५१७५३.

तसेच नमुद गुन्हयातील साक्षीदार नामे दिपक सोमदत्त सोजराणी, रा.ठी. ४०३/ए - ९, चिन्मयी शांती धाम, मीरा रोड पुर्व, जि. ठाणे यांची सुध्दा आरोपी क्रमांक ०३ याचेकडुन फसवणुक झाली असुन त्यांचा सविस्तर जबाब नोंद करून गुन्हयाचे कागदपत्रात समाविष्ट करण्यात आला आहे. सदर प्रकरणात फिर्यादी व साक्षीदार यांचे प्रमाणे इतरही नागरिकांची फसवणुक झाल्याची प्राथमिक माहिती तपासात उघड झालेली आहे. यातील आरोपी क्र. ०३ याचा गुन्हे अभिलेख तपासला असता तो पुढील प्रमाणे

१. कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे, गु.र.क्र.३६४/२०२५ कलम ३१८, १३६ (२), ३ (५) बीएनस.
२. साकिनाका पोलीस ठाणे गु.र.क्र.४५९/२०१८ कलम १४९, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब) भादवि.
३. खेरवाडी पोलीस ठाणे गु.र.क्र.१८२/२०१८ कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ भादवि.
४. अंधेरी पोलीस ठाणे गु.र.क्र. २२०/२०१९ कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ५११, ३४ भादवि.

**युनिट ०१, गु.प्र.शा., गु.अ.वि तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/अंमलदार नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | अरविंद वसंत पाटील | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | गणेश दिनकर पिसाळ | प्रशस्तीपत्रक |
| ३ | सहा. पोलीस निरीक्षक | देविदास गंगाधर लाब्धे | प्रशस्तीपत्रक |
| ४ | सहा. पोलीस निरीक्षक | महेश गजानन सांगळे | प्रशस्तीपत्रक |
| ५ | श्रेणी. पोलीस उप निरीक्षक | जितेंद्र बाळकृष्ण शेडगे | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पो.ह.क्र. ०८११८७ | शेखर पद्माकर वेडगे | प्रशस्तीपत्रक |

**मजकुर :-**

दिनांक १०/०७/२०२६ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **"Best Conviction of the Month"** माहे **जून २०२६** या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ जून २०२६ - ०२ गुन्हे

| | | |
|---|---|---|
| ०१ | **मानखुर्द पो.ठाणे**<br>पूर्व, परिमंडळ ०१, मुंबई. | **गु.र.क्र. व कलम**:- ५३५/२०२१ कलम ३७६ (२)(एन) ५०६ भादवि. सह कलम ४, ६, ८, १२ पोक्सो |

**-: " अल्पवयीन मुलीवर बलात्कार " :-**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :-** नमुद गुन्हयांत आरोपीत याने फिर्यादी यांची अल्पवयीन बहीण कुलसुम वय १६ हिचेवर जबरदस्तीने बलात्कार करुन लैंगिक सतावणुक केली तसेच बघुन घेण्याची धमकी दिली म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :- | श्री. सददाम हुसेन सिराज अहमद अन्सारी वय १९ |
| **निकाल दिनांक** | :- | **२३/०६/२०२६** |
| **बळीत** | :- | फिर्यादी यांची अल्पवयीन बहीण कुलसुम वय १६ |
| **अटक आरोपी व अटक दिनांक** | :- | जहीर झाकीर हुसेन शेख, वय ३८<br>**अटक दिनांक:-** ३१/०८/२०२१ |
| **दोषसिध्दीचा तपशील** | :- | नमुद गुन्हयात दि.२३/०६/२०२६ रोजी मा.३५ वे न्यायालय न्यायाधिश श्रीमती आर.जे.पवार यांनी आरोपीत जहीर झाकीर हुसेन शेख यास सदर गुन्हयात दोषी ठरवून १. **कलम ६ पोक्सो अंतर्गत** २० वर्षे सक्त मजुरी व ३००० रुपये द्रव्यदंड व दंड न भरल्यास ३ महिने साधी कैद व<br>२. **कलम ५०६ भादवी** अंतर्गत २ वर्षे सक्त मजूरी व २००० रु द्रव्यदंड व दंड न भरल्यास ०२ महिने साधी कैद अशी शिक्षा सुनावली. |

**तपास कौशल्य** :- मा. वरिष्ठांचेमार्गदर्शना खाली साक्षीदार तसेच पंच यांना योग्य रितीने ब्रिफींग करण्यात आले. गुन्हयाचे सुनावणी दरम्यान विहीत वेळेत मुद्देमाल व त्याचे अहवाल सादर करण्यात आले. समन्स व वॉरंट पथकातील अंमलदार यांनी विहीत वेळेत वॉरंटची बजावणी केली व साक्षीदारांना मा. न्यायालयात हजर ठेवले. सदर गुन्हयाचे सरकारी वकील यांचेशी तपासी अधिकारी व कोर्ट अंमलदार यांनी योग्य समन्वय राखल्याने आरोपी विरुध्द सबळ पुरावे मा. न्यायालया समोर विहीत वेळेत हजर करुन नमुद गुन्हयातील आरोपीविरुध्द सबळ पुरावे प्राप्त करण्यात आले.

तपासी पथकातील तसेच न्यायालयीन कामकाज करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीस दोषसिध्दी प्राप्त करण्याकरीता उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

**मनखुर्द पोलीस ठाणे तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/अंमलदार नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | हणमंत गोविंद ओऊळकर | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस उप निरीक्षक | संजय नामदेव गांवकर | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पोलीस उप निरीक्षक | जोत्स्ना विठ्ठल धोंडे | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पो.शि.क्र.११२३३३ | शुभांगी जितेंद्र पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ५ | म.पो.शि.१३०१५४ | तेजश्री रामचंद्र कारंडे | प्रशस्तीपत्रक |

| ०२ | **मेघवाडी पो.ठाणे** पश्चिम, परिमंडळ ०३, मुंबई. | **गु.र.क्र. व कलम**:- १९०/२०२०, कलम ३०२, ३०७ भादंवि |
|---|---|---|

**-: " खून " :-**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :-** नमुद गुन्हयांत फि' दि २५/०५/२०२० रोजी संध्याकाळी शनमुगम हा श्री. मुत्तूमारी अम्मन मंदिराजवळे बसला होता. त्याठिकाणी फि'चा भाऊ अजय हा गेला असता, त्यास शनमुगन याने त्यास बियर आणण्यास सांगितले असता त्याने त्यास नकार दिला. या कारणावरून त्यांच्यामध्ये वाद होवून त्यांच्यामध्ये शाब्दीक बाचाबाची झाली. शनमुगन याने अजय यास बघून घेण्याची धमकी दिली होती. त्यानंतर रात्री ११.३० वाजताच्या सुमारास फिर्यादी हे घरी असताना त्यांचा भाऊ अजय हा घराबाहेर गेला होता. काही वेळाने गल्लीमध्ये गोंधळ ऐकू आला म्हणून ते घरातील सर्वजण श्री. मुत्तूमारी अम्मन मंदिराजवळ गेले असता अजय व शनमुगन यांनी एकमेकांना पकडले होते, त्यावेळी शनमुगन याच्या हातामध्ये एक अणकुचीदार हत्यार होते. शनमुगन हा अजय यास हाताने मारत असल्याने फिर्यादी त्यास त्याच्या तावडीतून सोडविण्याचा प्रयत्न केला असता, शनमुगन याने त्याच्या हातातील अणकुचीदार हत्याराने फिर्यादीच्या उजव्या हाताच्या दंडावर व कपाळावर दोन्ही भुवयाच्या मध्ये जोराने वार केले असता ते जबर जखमी झाले. ते पाहून अजय फिर्यादीना त्याच्या तावडीतून सोडविण्यासाठी पुढे गेला असता, शनमुगन याने त्याच्या हातातील सुळयासारखे दिसणाऱ्या अणकुचीदार हत्यार जोराने त्याच्या छातीत खुपसल्याने तो जागीच कोसळला. हे पाहून शनमुगन हा तेथून हत्यारासह पळून गेला. सदरवेळी फिर्यादीचा भाऊ अजय हा काहीच बोलत नसल्याने व तो अत्यावस्थ झाल्याने त्यास उपचारासाठी कुपर रुग्णालयात नेले असता वैद्यकिय अधिकारी यांनी त्यास दाखलपुर्व मयत घोषीत केले म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :- | श्री. विजयकुप्पू स्वामी द्रविड, वय ३२ |
| **निकाल दिनांक** | :- | **१८/०६/२०२६** |
| **बळीत** | :- | फिर्यादी यांची भाऊ अजय (मयत) |
| **अटक आरोपी व अटक दिनांक** | :- | शनमुगम राजेन्द्रन उर्फ सॅम उर्फ सोनू, वय ३६<br>**अटक दिनांक:-** २६/०५/२०२० |
| **दोषसिध्दीचा तपशील** | :- | नमुद गुन्हयात दि.१८/०६/२०२६ रोजी अटक आरोपी यास मा.न्यायालयाने दोषसिध्द ठरवून सदर आरोपीस<br>१) कलम ३०२ भादवि अंतर्गत **आजन्म कारावास व ५०००/- रु द्रव्य दंड आणि दंड न भरल्यास ३ महिने साधी कैद**<br>२) कलम ३२४ भादवि करीता **३ वर्षे कारावास व ३०००/-रूपये द्रव्य दंड आणि दंड न भरल्यास २ महिने साधी कैद** ही शिक्षा सुनावली. |

**तपास कौशल्य** :- सदर खटल्याचे सुनावणीचे वेळी वेळोवेळी देखरेख करून, यातील साक्षीदार यांना मा. न्यायालयातून काढण्यात आलेल्या समन्सची तात्काळ बजावणी करून साक्षीदार यांना वेळेत मा.न्यायालयात हजर ठेवून तसेच गुन्हयातील मुद्देमाल व तज्ञांचे अहवाल मा. न्यायालयात सादर.योग्य व त्रुटीरहीत तपास केल्यामुळे दोषारोप सिध्द होवून आरोपीतास शिक्षा झाली.

तपासी पथकातील तसेच न्यायालयीन कामकाज करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीस दोषसिध्दी प्राप्त करण्याकरीता उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

**मेघवाडी पोलीस ठाणे तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/अंमलदार नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | श्याम रामचंद्र पवरे | प्रशस्तीपत्रक |
| २ | पो.ह.क्र.९६१८९९ | सुनिल चांगदेव नांदे | प्रशस्तीपत्रक |
| ३ | म.पो.शि.११२४२८ | सुरेखा विकास मोरे | प्रशस्तीपत्रक |

**टिपः-** वरिष्ठ/प्रभारी पोलीस निरीक्षक, **एम.आय.डी.सी पोलीस ठाणे व युनिट ०१, गुप्रशा**. **गुअवि** यांना "Best Detection of the Month **June 2026**" तसेच **मानखुर्द व मेघवाडी पोलीस ठाणे**, मुंबई यांना "Best Conviction of the Month **June 2026**" या करीता निवड झाली असून, कळविण्यात येते की राज्य स्तरावर गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न (Best Detection of the Month) व सर्वोत्कृष्ट अपराध सिध्दी (Best Conviction of the Month) करीता प्रत्येक महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद **प्रपत्र 'क'** प्रमाणे माहिती भरुन सोबत तपासी पथकातील फक्त ०४ जणांच्या नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व अंमलदार यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटक प्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे.

# Best Detection of the Month

## 'प्रपत्र 'क'

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे/गु.र.नं. व कलम | |
| ०२ | फिर्यादीचे नाव, पत्ता | |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०५ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०७ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०८ | Property offence बाबतीत<br>a) गेलेला माल b) जप्त/हस्तगत केलेला माल | |
| ०९ | मयत/पिडीत व्यक्तीची माहिती | |
| १० | आरोपी मृतक/पिडीत नाते | |
| ११ | गुन्हयात तपासलेले प्रत्यक्ष साक्षीदार व त्यांचे पुरावा योग्य जबाब थोडक्यात | |
| १२ | घटनास्थळ पंचनामा वरून प्राप्त पुरावे<br>a) घटनास्थळ फोटो / छायाचित्रण केले आहे का? | |
| १३ | Inquest पंचनामा माहिती | |
| १४ | शवविच्छेदन अहवाल माहिती | |
| १५ | गुन्हयात वापरेले शस्त्र/जखमा याबाबत वैदयकीय अधिकारी अभिप्राय | |
| १६ | DNA टेस्ट केली असल्यास न्यायवैद्यक प्रयोगशाळेचे अहवाल | |
| १७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १९ | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| २० | CDR/SDR/C.C.T.V/Electronic Evidence बाबत माहिती भा.पु.का.क. ६५(ब) प्रमाणे प्रमाणपत्र हस्तगत केले आहे का ? | |
| २१ | Cyber Expert ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २२ | FORENSIC Expert ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २३ | Dog Squad ची मदत घेतली का ? कशप्रकारे | |
| २४ | Fingerprint / Handwriting Expert ची मदत घेतली का | |
| २५ | आरोपी Portrait बाबत Expert ची मदत घेतली का ? | |
| २६ | आरोपीचे पुर्वीचे गुन्हेगारी रेकॉर्ड तपासून निष्पन्न झालेली माहिती | |
| २७ | गुन्हयात कोणती टोळी (गॅंग) निष्पन्न झाली आहे का ? असल्यास माहिती | |
| २८ | आरोपीची ओळख परेड कार्यकारी दंडाधिकारी समोर घेतली आहे का ? | |
| २९ | जप्त मालाची ओळख कार्यकारी दंडाधिकारी समोर करून घेतली का ? | |
| ३० | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी व आरोपी अटकेसाठी केलेल प्रयत्न थोडक्यात | |
| ३१ | आरोपी अटकेसाठी कलेले प्रयत्न थोडक्यात | |
| ३२ | गोपनीय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली | |
| ३३ | गुप्तवार्ता संकलनामध्ये खाजगी व्यक्तीची मदत घेतली का? | |
| ३४ | गुप्त बातमीदार पोलीसांनी स्वत: नेमले होते का ? | |
| ३५ | **गुन्हा उघडकीस आणण्याकरीता योगदान देणारे पोलीस अधिकारी/पोलीस अंमलदार (फक्त ४) यांची नावे व मोबाईल क्र.** | |

१) F.I.R प्रत, सर्व पंचनाम्याचे प्रती, महत्वाचे साक्षिदारांचे जबाब, शवविच्छेदन अहवाल, ओळखपरेड कागदपत्रे, वैदकीय अधिकारी यांचे शस्त्र व जखमांबाबत अभिप्राय, आरोपी पुर्वीचे गुन्हेगारी Record, दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेली प्रत, Inquest पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, भा.पु.का., कलम २७ प्रमाणे जप्ती पंचनामा, इत्यादी कागदपत्रे सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यामध्ये दाखल करण्यात आले आहे, त्याच महिन्याच्या सर्वोत्कृष्ट गुन्ह उकल (Best Detection) बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. दोषारोपपत्र दाखल झालेल्या दिनांकापासून ०१ महिन्याच्या आत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचाच सदर बक्षिसाकरीता विचार करण्यात येईल.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

# Best Conviction of the Month

## 'प्रपत्र 'क'

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे/गु.र.न. व कलम | |
| ०२ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०३ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०४ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०५ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, कोर्ट केस क्रमांक, न्यायालय, | |
| ०७ | गुन्हयाचा निकाल दिनांक | |
| ०८ | गुन्हयातील निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०९ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १० | फरार आरोपी अटक, सी.आर.पी.सी., कलम ८२,८३ नुसार कार्यवाही केली आहे का ? | |
| ११ | प्रत्येक आरोपीला झालेली शिक्षा | |
| १२ | न्यायालयाने ज्या पुरावा साखळीचे आधारे शिखा दिली त्याबाबतची सविस्तर माहिती.<br>a) साक्षीदारांचे न्यायालयासमोर जबाब<br>b) पंचांचें न्यायालयासमोर जबाब<br>c) परिस्थितीजन्य पुरावा साखळी<br>d) तज्ञ व्यक्तीचे जबाब<br>e) तपासी अंमलदार यांचे जबाब<br>f) पैरवी अधिकारी नाव व कामगिरी<br>g) सरकारी वकील नाव व कामगिरी | |
| १३ | **तपास व अपराधसिध्दी करिता योगदान देणारे पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार (फक्त ४) यांची नावे व मोबाईल क्रमांक** | |

**१) प्रस्तावासोबत गुन्हयाची प्रथम खबर. दोषारोपपत्र** (A to E Form) **व मा. न्यायालयाचे निकालपत्र जोडण्यात यावे.**

**२) गुन्हयाचे निकाल ज्या महिन्यामध्ये देण्यात आललो आहे, त्याच महिन्याच्या सर्वोत्कृष्ट अपराधसिध्दी बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. निकाल लागलेल्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचाच सदर बक्षिसाकरीता विचार करण्यात येईल.**

**३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.**

# Best Recovery of the Month

## ‘प्रपत्र ‘ क ’

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे/गु.र.न. व कलम | |
| ०२ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०३ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०४ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०५ | गेलेला माल | |
| ०६ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०७ | गुन्हा उघडकीस आणणारे अधिकारी, अंमलदार | |
| ०८ | गुन्हा उघडकीस आला तारीख | |
| ०९ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १० | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ११ | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १२ | भा.द.वि. कलम ४११ ते ४१४ प्रमाणे कारवाई केली आहे का? | |
| १३ | मोका अंर्तगत कारवाई केली असल्यास आरोपीची मालमत्ता जप्ती प्रक्रियेबाबत केलेल्या कारवाईचे विवरण | |
| १४ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, केस क्रमांक, न्यायालय | |
| १५ | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी केलेल प्रयत्न.<br>a) घटनास्थळावरुन प्राप्त पुरावे ( घटनास्थळ पंचनामा जोडावा)<br>b) तपासलेले साक्षीदार संख्या<br>c) गुन्हा उघडकीस आणण्यासाठी सांक्षीदारांची कशी मदत झाली<br>d) Dog Squad ची मदत<br>e) Fingerprint / Handwriting Expert ची मदत.<br>f) Cyber Expert ची मदत<br>g) FORENSIC Expert ची मदत<br>h) CDR/SDR/C.C.T.V/Electronic Evidence माहिती<br>i) गुन्हेगारां संदर्भातील रेकॉर्ड /हिस्ट्रीशीट KCR इतर तपासले असल्यास त्या संदर्भातील इतर गुन्हयांची माहिती<br>J) गुप्त बातमीदार /गोपनिय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली<br>k) परत मिळालेल्या मालाची कार्यकारी दंडाधिकारी समोर ओळख पटवली आहे का ?<br>l) मौल्यवान मालाचे मुलयांकन करून घेतले आहे का ? | |
| १६ | तपासाकरीता योगदान देणारे पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार (फक्त ४) यांची नावे व मोबाईल क्रमांकयांची नावे | |

१) दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल केल्याची प्रत प्रस्तावासोबत जोडण्यात यावी.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यात दाखल करण्यात आले आहे. त्याच महिन्याचे सर्वोत्कृष्ट मालमत्ता हस्तगत बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. दोषारोपपत्र दाखल झालेल्या दिनांकापासून ०१ महिन्याच्या आत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचाच सदर बक्षिसाकरीता विचार करण्यात येईल.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

# <u>INTEGRITY CERTIFICATE</u>

Certified that the integrity of Mr/Mrs ………………………………., Designation- …………………., Recommended for the award of **" Excellence in Investigation"** for the Month of ……..Year 2026 is above suspicion and that he / she was not concerned in any proceeding that was censured in a court of law. It is further certified that no judicial or departmental proceeding are being contemplated / pending against him / her similarly no vigilance case is being contemplated/pending against him/her. It is also certified that recommendee has not been given any Major Penalty/Minor penalty in the last Five year.

2. It is also certified that the character and antecedents (of the proposed awardee) have been duly verified and nothing adverse reported against him/her.

**Name:-**
Desiganation:- Addl. Commissioner of Police
…………. Mumbai
Contact No :- 022-
Date :- / /2026